**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

जाहीरात क्र. साप्रवि-१२०२२/१६/२०२६/साप्रवि(कक्ष-६), दिनांक- १३ मे, २०२६.

विषय :- **महाराष्ट्र राज्य माहिती आयोगातील राज्य माहिती आयुक्त यांचे १ रिक्त पद भरण्याबाबत.**

महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाची स्थापना केली असून आयोगाचे मुख्यालय बृहन्मुंबई येथे आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगातील राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त यांचे अधिकार व कार्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार आहेत. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगातील राज्य माहिती आयुक्तांचे एक रिक्त पद भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

२. माननीय सर्वोच्च न्यायालयाने अंजली भारद्वाज विरूद्ध भारत सरकार व इतर (रिट पिटीशन-सिव्हील क्र.४३६/२०१८, आदेश दि.१५.०२.२०१९) या प्रकरणात माहिती आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता, वस्तुनिष्ठता व गुणवत्ताधारित निवड सुनिश्चित करण्यासाठी पात्रता निकष, निवड प्रक्रिया व उमेदवारांच्या छाननीची पद्धत पूर्वनिश्चित करून ती सार्वजनिक करणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले आहेत. सदर न्यायालयीन निर्देशांच्या अनुषंगाने, शासन निर्णय दिनांक ७ जानेवारी २०२५ अन्वये गठित शोध समितीने दि.२४.०४.२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त या पदांसाठी अटी व शर्ती निश्चित केल्या असून त्या शासन निर्णय दि.२७ एप्रिल २०२६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने राज्य माहिती आयुक्त या पदांसाठी खालील पात्रता व निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत

३.(अ) अधिनियमातील मुलभूत पात्रता :- माहितीचा अिधकार अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य माहिती आयुक्त-

(i) कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

(ii) संसदेचा सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या, किंवा संघ राज्यक्षेत्राच्या विधानमंडळाचा सदस्य असणार नाही. किंवा इतर कोणतेही लाभपद धारण करणार नाही. किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असणार नाही किंवा कोणताही उद्योगधंदा अथवा व्यवसाय करणार नाही.

(ब) इतर अटी व शर्ती :- शोध व छाननी समितीने दि.२४.०४.२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत निश्चित केलेल्या व शासन निर्णय दि.२७ एप्रिल २०२६ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अटी व शर्ती

**(i) किमान अनुभव** : अर्जदारास उपरोक्त पैकी एक किंवा अधिक क्षेत्रांमध्ये किमान १५ वर्षाचा अनुभव असावा. शासन ,निम-शासकीय , स्वायत्त संस्था, सार्वजनिक क्षेत्र, नामांकित खाजगी क्षेत्र व सामाजिक / धर्मादाय संस्थांमध्ये वरिष्ठ पदावरील अनुभवास प्राधान्य देण्यात येईल.

**(ii)वयोमर्यादा :-** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किमान वय ४५ वर्षे व कमाल वय ६३ वर्ष इतके असावे.

**(iii) शिक्षण :-** अर्जदार हा कोणत्याही शाखेतील किमान पदवीधर असावा.

**(iv) आवश्यक कौशल्ये :-** अर्जदाराकडे माहितीचा अधिकार अधिनियम व संबंधित कायद्यांचे ज्ञान. अर्ध-न्यायिक कार्यपद्धतीची जाण, पारदर्शकता, उत्तरदायित्व व सुशासन या मूल्यांप्रती बांधिलकी, प्रशासकीय नेतृत्व व निर्णयक्षमता असावी.

**(v) अर्ज सादरीकरणाशी संबंधित अटी** :- अर्ज निर्धारित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील, सविस्तर बायोडेटा, अनुभव विवरण, कार्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

**(vi) अर्जासाठी शुल्क :-** अर्ज सादर करतांना त्यासोबत रू.१०००/- इतके शुल्क देय राहील. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे शुल्क भरण्याच्या ज्या पद्धती आहेत त्यापैकी कोणत्याही पद्धतीने शुल्क भरून त्याची पावती अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**(vii) शपथपत्र :-**अर्जदाराने त्याच्याविरूद्ध कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे, फौजदारी खटला प्रलंबित नसल्याचे व शासकीय निम-शासकीय सेवेत असल्यास शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रलंबित अथवा प्रस्तावित नसल्याचे शपथपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

४. राज्य माहिती आयुक्त यांचा पदावधी, वेतन, भत्ते व सेवेच्या अन्य अटी व शर्ती माहितीचा अधिकार (केंद्रीय माहिती आयोगात मुख्य माहिती आयुक्त, माहिती आयुक्त तथा राज्य माहिती आयोगात राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांचा पदावधि, वेतन, भत्ते आणि सेवेच्या अन्य अटी व शर्ती) नियम, २०१९ नुसार असतील. (केंद्र शासनाची अधिसूचना दिनांक २४ऑक्टोबर, २०१९)

५. राज्य माहिती आयुक्त पदावरील नियुक्तीसाठी पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी त्यांचा तपशील मराठी किंवा इंग्रजीमध्ये सोबत जोडलेल्या विहित प्रपत्र व जोडपत्रासह, लिफाफ्यावर "राज्य माहिती आयुक्त पदासाठी अर्ज" असे लिहून पोस्टाने, उप सचिव (माहिती (कार्यासन-६), सामान्य प्रशासन विभाग, १९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२ किंवा स्व:हस्ते **दिनांक १२ जून २०२६, पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** पाठवावेत.

६. राज्य/केंद्र शासन किंवा अन्य कोणत्याही संघटनेत सेवेत असलेल्या व्यक्तींनी त्यांचा अर्ज विहित मार्गाने (प्रशासकीय विभाग / राज्य / केंद्रशासित प्रदेश यांचे मार्फत) **अंतिम दिनांकापूर्वी** पाठवावा.

७. महत्त्वाच्या सूचना :-

- अर्जासोबत सविस्तर बायोडेटा, शैक्षणिक पात्रतेचे दाखले, अनुभव विवरण, कार्याचे पुरावे, रु. १,०००/- चे शुल्क भरणा पावती व शपथपत्र जोडावे.
- अर्ज अंतिम दिनांकापूर्वी किंवा त्या दिनांकापर्यंत पोहोचणे बंधनकारक आहे. उशिरा प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत
- अपूर्ण अर्ज, विहित नमुन्याशिवाय सादर केलेले अर्ज व शुल्क न भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- शासन निर्णय क्र. साप्रवि-१२०२२/१६/२०२६-साप्रवि/माहिती (कक्ष-६) दि.२७ एप्रिल २०२६ महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ.अतुल पाटणे)
महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोगातील राज्य माहिती आयुक्त पदाच्या विचारार्थ**
**पाठवावयाच्या तपशीलाचे विहित प्रपत्र**

कृपया पासपोर्ट
आकाराचे नवीनतम
छायाचित्र चिकटवावे

१. नाव :

२. जन्मदिनांक

३. दिनांक १२.०६.२०२६ रोजी वय : ------वर्ष -----महिने-----दिवस

४. सध्याचा पत्ता :

५. मोबाईल क्र. :

६. ई-मेल पत्ता :

७. शैक्षणिक अर्हता :

८. प्रख्यात असलेले क्षेत्र

| प्रख्यात असलेले क्षेत्र | |
|---|---|
| कायदा, | |
| विज्ञान व तंत्रज्ञान | |
| समाजसेवा | |
| व्यवस्थापन | |
| पत्रकारिता | |
| जनसंपर्क माध्यम | |
| प्रशासन आणि शासन | |

९. सध्याचा व्यवसाय :

१०. सेवानिवृत्त असल्यास, किंवा सेवेत असल्यास त्याबाबतचा तपशील :

११. उपलब्धि/अनुभव (जोडपत्रानुसार) :

दिनांक : सही

ठिकाण नाव:

जोडपत्र

## राज्य मुख्य माहिती आयुक्त/राज्य माहिती आयुक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराच्या कामगिरी/कार्य अनुभवाचा तपशील (संक्षिप्त)

| अ क्र.. | पद | संघटना | कालावधी | | कामगिरी/कार्य अनुभवाचा तपशील (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department,
19th Floor, New Administration Building,
Madame Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Opp. Mantralaya, Mumbai--400 032.

Government Letter No. GAD-12022/3/2024-GAD(DESK-6),
Dated- 13 May 2026.

Subject: **Filling up of 1 vacant post of State Information Commissioner in the Maharashtra State Information Commission.**

The Government of Maharashtra has constituted the Maharashtra State Information Commission under the Right to Information Act, 2005 and the Headquarters of the Commission is situated at Greater Mumbai. The powers and functions of the State Chief Information Commissioner and the State Information Commissioners of the Maharashtra State Information Commission are as provided under the Right to Information Act, 2005. Advertisement is hereby issued for filling up one vacant post of State Information Commissioner in the Maharashtra State Information Commission.

2. The Hon'ble Supreme Court in *Anjali Bhardwaj vs. Union of India & Others* (Writ Petition-Civil No. 436/2018, Order dated 15.02.2019) has directed that the eligibility criteria, selection process and procedure for scrutiny of candidates shall be predetermined and placed in the public domain in order to ensure transparency, objectivity and merit-based selection in the appointment process of Information Commissioners. In accordance with the said judicial directions, the Search-cum-Screening Committee constituted vide Government Resolution dated 7 January 2025, in its meeting held on 24.04.2026, has finalized the terms and conditions for the posts of State Chief Information Commissioner and State Information Commissioner and the same have been published vide Government Resolution dated 27 April 2026. Accordingly, applications are invited from interested candidates fulfilling the following eligibility criteria and conditions for the post of State Information Commissioner.

3.(A) **Basic Eligibility under the Act :-**As per the provisions of the Right to Information Act, the State Information Commissioner:-

(i) shall be a person of eminence in public life with wide knowledge and experience in law, science and technology, social service, management, journalism, mass-media or administration and governance.

(ii) shall not be a Member of Parliament or Member of the Legislature of any State or Union Territory, as the case may be, or hold any other office of profit or connected with any political party or carrying on any business or pursuing any profession. It is clarified that cessation/termination of holding of office of profit, pursuing any profession or carrying any business is a condition precedent to the appointment of a person as Chief Information Commissioner.

(B) **Other Terms and Conditions :-**Terms and conditions finalized by the Search-cum-Screening Committee in its meeting held on 24.04.2026 and published vide Government Resolution dated 27 April 2026:-

(i) **Minimum Experience :-**The applicant shall have minimum 15 years of experience in one or more of the aforesaid fields. Preference shall be given to persons having experience in senior positions in Government, Semi-Government, Autonomous Institutions, Public Sector, reputed private sector organizations and social/charitable institutions.

(ii) **Age Limit :-**The applicant shall have attained minimum age of 45 years and shall not exceed 63 years as on the last date of submission of application.

(iii) **Educational Qualification :-**The applicant shall be at least a graduate in any discipline.

(iv) **Required Competencies :-**The applicant shall possess knowledge of the Right to Information Act and related laws, understanding of quasi-judicial procedures, commitment towards transparency, accountability and good governance, administrative leadership and decision-making ability.

(v) **Conditions relating to submission of application :-**Application shall be submitted in the prescribed format. Detailed bio-data, experience details and proof of work/achievements shall be mandatorily enclosed.

(vi) **Application Fee :-**An application fee of Rs.1000/- shall be payable along with the application. The fee shall be paid through any of the modes prescribed for payment of fees under the Right to Information Act and proof/receipt thereof shall be enclosed with the application.

(vii) **Affidavit :-**The applicant shall submit an affidavit stating that no criminal offence has been registered against him/her, no criminal case is pending and, in case of persons serving in Government/Semi-Government service, no disciplinary proceedings are pending or contemplated against him/her.

4. The tenure, salary, allowances and other terms and conditions of service of the State Information Commissioner shall be governed by the *Right to Information (Term of Office, Salaries, Allowances and Other Terms and Conditions of Service of the Chief Information Commissioner, Information Commissioners in the Central Information Commission, and the State Chief Information Commissioner and State Information Commissioners in the State Information Commission) Rules, 2019* (Government of India Notification dated 24 October 2019).

5. Interested persons fulfilling the eligibility criteria for appointment to the post of State Information Commissioner shall submit their particulars in Marathi or English in the prescribed format and annexure enclosed herewith. The application shall be superscribed on the envelope as “Application for the post of State Information Commissioner” and sent by post to the Deputy Secretary (Information / Desk-6), General Administration Department, 19th Floor, New Administrative Building, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Opposite Mantralaya, Mumbai – 400 032 or delivered by hand on or before 12 June 2026 up to 5.00 p.m.

6. Persons serving in the State/Central Government or any other organization shall submit their applications through proper channel (through Administrative Department / State / Union Territory concerned) before the last date.

7. **Important Instructions** :-

(i) Detailed bio-data, educational qualification certificates, experience details, proof of work/achievements, receipt of payment of Rs.1000/- application fee and affidavit shall be enclosed with the application.

(ii) The application must reach on or before the last date prescribed. Applications received late shall not be considered.

(iii) Incomplete applications, applications not submitted in prescribed format and applications without payment of fee shall not be considered.

(iv) Government Resolution No. GAD-12022/16/2026-GAD/Information (Desk-6) dated 27 April 2026 is available on the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in.

(Dr. Atul Patne)
Principal Secretary to Government

Pro-forma for sending particulars for consideration for the post of the State Information Commissioner in the Maharashtra State Information Commission

Please affix the latest passport

1. Name :

2. Date of Birth :

3. Age as on date 12.06.2026 : ----- years ----- Months---- Days

4. Present Address :

5. Mobile No. :

6. E-mail Address :

7. Educational Qualification :

8. Area of Eminence :

| Area of Eminence | |
|---|---|
| Law | |
| Science and Technology | |
| Social Service | |
| Management | |
| Journalism | |
| Mass-Media | |
| Administration and Governance | |

9.Present Occupation :

10. Whether retired, or in service please mention details, if any :

11. Achievements/Work Experience (As per Annexure) :

Date: Signature:

Place: Name:

Annexure

Details of Achievements/Work Experience in respect of candidates applying for the post of State Information Commissioner in Maharashtra State Information Commission

| Sr. No. | Post | Organisation | Period | | Details of achievements/experience (in brief) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | From | To | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |